# 'मी फॉर माय सिटी' कॅनरा एचएसबीसी ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स लाइफ इन्शुरन्सचा उपक्रम



मुंबई (कौशिक माधवानी) कॅनरा एचएसबीसी ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स लाइफ इन्शुरन्सने स्वच्छ आणि सुंदर शहराच्या गरजेबद्दल जागरूकता पसरवण्यासाठी रेडिओ मिर्चीशी भागिदारीत आज 'मीफॉरमायसिटी' हे कॅम्पेन मुंबईच्या लोअर परेल भागातील हायस्ट्रीट फिनिक्स मॉलमध्ये सुरू केले आहे. दिल्ली, गुरुग्राम आणि मोहाली येथे यशस्वी लाँच केल्यानंतर हा उपक्रम देशाच्या आर्थिक राजधानीत मुंबईत लाँच करण्यात आले आहे. हा उपक्रम लोकांना शहरातील स्वच्छता वाढवण्यासाठी आणि भिंतींवर ग्राफिटी आर्टद्वारे कलाकुसर करून भारतीय कलेची अनुभूती देण्याच्या उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रेरणा देणारा आहे. मुंबईसाठीचा संदेश 'प्रॉमिस मुंबई करेगा' या संकल्पनेवर आधारित असून त्याद्वारे मुंबई स्वच्छ आणि सुंदर केली जाणार आहे. या कार्यक्रमात प्रसिद्ध बॉलिवूड गायक केके यांचा कॉन्सर्ट आयोजित करण्यात आला होता व त्यानंतर ग्राफिटीचे अनावरण करण्यात आले.